 **नियमित फौजदारी केस क्र.४९/२०१४**
**निशाणी क्र.५७**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ याची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | – | नसीम महामुद दरेखान |
| वय | – | ४६ वर्षे |
| व्यवसाय | – | व्यापार |
| राहणार | – | जिते, दरेखान मोहल्ला, ता. महाड, जि. रायगड. |

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. प्रकाश जोशी यांच्यामार्फत शपथेवर सुरु</u>**

०१. दिनांक २२/०१/२०१४ रोजी सकाळी ९.०० वाजता आमवे चुलते बशीर दरेखान यांच्या हद्दीतील बोरीचे झाड कोणीतरी तोडले. त्यावेळी आमची चुलती बानू बशीर दरेकर ही कोणाला न उद्देशून शिवीगाळ करीत होती. त्यावेळी फईज फकीर दरेखान, फकीर बाबा दरेखान, रहमत फकीर दरेखान, दिलशाद हुसेनमियाँ दरेखान, फैरोजा दिलावर दरेखान व त्यांची मुलगी नुसरत दरेखान हे सर्वजण धावत आमचे चुलते बशीर दरेखान यांच्या ओटीवर आले व त्यांनी काठीने व शिगेने बशीर दरेखान, बानू दरेखान व त्यांची मुलगी फिरदोस यांना मारहाण केली. त्यावेळी मी त्यांना सोडवावयास गेलो. त्यावेळी वर नमुद सर्व लोकांनी मला देखील काठी व शिगेने मारहाण केली. सदर घटनेबाबत चुलते बशीर दरेखान यांनी तक्रार दिली. मारहाण करणा–यांपैकी रहमत फकीर दरेखान, दिलशाद हुसेनमियाँ दरेखान आणि हुसेनमियाँ उमर दरेखान हे आज रोजी हजर आहेत. काठया व शिग पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपींनी ज्या काठयांनी मारहाण केली, त्या मुद्देमाल अनुक्रमांक १ ते ३ दाखविल्या. त्यापैकी काठयांना अनुक्रमे <u>अ व ब</u> असे आर्टिकल देण्यात येते. शिगेस <u>आर्टिकल क</u> देण्यात येते. **(आरोपीतर्फे वकिलांनी निशाणी क्र.५६ येथे अर्ज देउन आरोपी क्र.५ व**

**६ यांची गैरहजेरीची माफी मागितली व त्यांच्या गैरहजेरीत पुरावा घेण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येते).**

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आरीफ देशमुख यांच्यामार्फत सुरु**

०२. फईज फकीर दरेखान, फकीर बाबा दरेखान, रहमत फकीर दरेखान, दिलशाद हुसेनमियाँ दरेखान, फैरोजा दिलावर दरेखान व त्यांची मुलगी नुसरत दरेखान हे माझे नातेवाईक आहेत त्यामुळे मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, फईज दरेखान यास सन २०१२ मध्ये अर्धांगवायुचा झटका आला होता व तो मरेपर्यंत अंथरुणावर होता. माझे घर फिर्यादी व आरोपींच्या घरापासुन ५०० फुट लांब आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी, आरोपी व आमचे जागेवरुन वाद आहेत व ते या न्यायालयात प्रलंबित आहेत.

०३. आरोपी व फिर्यादीच्या घरासमोर मोठे अंगण आहे. अंगणाच्या समोर दगडाची भिंत आहे. सदर भिंतीला लागुन पुर्व–पश्चिम गावात जाणारा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, अंगणास व समोरच्या भिंतीला सर्वे नंबर ५५ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नंबर ५५ बाबत दिवाणी न्यायालयामध्ये वाद चालु आहे. घटनेच्या वेळी देखील त्याबाबत वाद सुरु होता. त्या जागेमध्ये माझ्या वडिलांचा देखील हिस्सा होता. सदर जागेबद्दल निकाल आरोपींच्या बाजुने झाला हे म्हणणे खरे नाही. माझे व फिर्यादी बशीर याचे घटनेच्या वेळी व आज देखील चांगले संबंध होते व आहेत.

**<u>न्यायालयाची मध्यंतराची वेळ झाल्याने उर्वरित उलटतपास दुपारच्या सत्रापर्यंत तहकुब.</u>**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
महाड (**एस. एस. पाटील**)
दिनांक – ०४/०८/२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

**<u>उर्वरित उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. आरीफ देशमुख यांच्यामार्फत सुरु</u>**

०४. काठया व शिग पोलीसाांनी माझ्यासमक्ष जप्त केलेल्या नाहीत. काठया व शिग यांचे मोजमाप मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल क्र. अ ते क या काठया व शिग यांनी आरोपींनी मारहाण केली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, बोराच्या झाडाची फांदी रस्त्यावर येत होती म्हणुन तोडली. हे म्हणणे खरे नाही की, सदर बोराच्या झाडाची फांदी आमच्या गावातील बाला भोसले याने तोडून नेली.

०५. अकबर अब्दुल रहेमान दरेखान याची सख्खी बहिण बशीर इस्माईल दरेखान यांना दिलेली आहे. इक्बाल अब्दुल रहेमान पेटकर उर्फ वारेकर हा फिर्यादी यांचा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीच्या ओटीवर फईज फकीर दरेखान, फकीर बाबा दरेखान, रहमत फकीर दरेखान, दिलशाद हुसेनमियाँ दरेखान, फैरोजा दिलावर दरेखान व त्यांची मुलगी नुसरत दरेखान हे सर्व आले हे मी प्रत्यक्ष पाहिले नाही. सुरुवातीला फिर्यादी व तिच्या पत्नीची व आरोपी यांच्यामध्ये काय बोलाचाली व आरडाओरड झाली हे मी प्रत्यक्ष पाहिले व ऐकले नव्हते.

सुरुवातीला कोणी कोणास काय शिवीगाळ केली हे मला माहीत नव्हते. गावातील मुळ रस्ता दक्षिण–उत्तर आहे. सदर मुख्य रस्त्याच्या पश्चिम बाजुस गावातील मशीद आहे. त्या रस्त्याच्या पुर्व बाजुस आजुबाजूला लागुन फिर्यादी व आरोपींची घरे आहेत. आरोपींच्या घराच्या उत्तर बाजुस इस्माईल दरेखान, अकबर दरेखान, निजाम दरेखान यांची घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या अंगणाच्या उत्तर बाजुस निजाम दरेखान यांचे दुकान आहे. आरोपींच्या घराच्या दक्षिण बाजुस लागुन मुसा व खलिल दाउद दरेखान यांची घरे आहेत. आरोपींच्या घराच्या पश्चिमेस रस्त्यानंतर मशीदीला लागुन सत्तार व गुलाम दरेखान यांची घरे आहेत. मशीदीच्या दक्षिणेस नियाज उस्मान दरेखान व अल्ताफ शौकत दरेखान यांची घरे आहेत. आरोपींच्या घरासमोरील रस्ता गावातील मुख्य रस्ता असल्यामुळे तेथुन लोकांचे नेहमी येणे–जाणे असते. हे म्हणणे खरे आहे की, निजाम दरेखान याच्या दुकानात लोक ये–जा करीत असतात.

०६. इस्माईल दरेखान, अकबर दरेखान, निजाम दरेखान, खलिल दरेखान, मुसा दरेखान, अल्ताफ दरेखान, नियाज दरेखान, सत्तार व गुलाम दरेखान यांचे फिर्यादीसोबत वाद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीची पत्नी आरोपी क्र.१ चे नाव घेउन शिवीगाळ करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरडाओरडा ऐकुन आम्ही देखील काठया, सळया घेउन आरोपी यांना मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी काठयांनी व शिगांनी आम्ही फकीर बाबा दरेखान, हुसेनमियाँ उमर दरेखान व इतर आरोपींना मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याविरुध्द या न्यायालयात फौजदारी खटला दाखल आहे. घटनेनंतर आरडाओरडा ऐकल्यानंतर माझ्याप्रमाणेच गावातील आजुबाजूचे लोक देखील जमा झाले होते.

०७. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२/०१/२०१४ रोजी सकाळी ९.०० वाजता आमवे चुलते बशीर दरेखान यांच्या हद्दीतील बोरीचे झाड कोणीतरी तोडले, त्यावेळी आमची चुलती बानू बशीर दरेकर ही कोणाला न उद्देशून शिवीगाळ करीत होती हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी फईज फकीर दरेखान, फकीर बाबा दरेखान, रहमत फकीर दरेखान, दिलशाद हुसेनमियाँ दरेखान, फैरोजा दिलावर दरेखान व त्यांची मुलगी नुसरत दरेखान हे सर्वजण धावत आमचे चुलते बशीर दरेखान यांच्या ओटीवर आले व त्यांनी काठीने व शिगेने बशीर दरेखान, बानू दरेखान व त्यांची मुलगी फिरदोस यांना मारहाण केली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी त्यांना सोडवावयास गेलो, त्यावेळी वर नमुद सर्व लोकांनी मला देखील काठी व शिगेने मारहाण केली, सदर घटनेबाबत चुलते बशीर दरेखान यांनी तक्रार दिली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, मारहाण करणा–यांपैकी रहमत फकीर दरेखान, दिलशाद हुसेनमियाँ दरेखान आणि हुसेनमियाँ उमर दरेखान हे आज रोजी हजर आहेत, काठया व शिग पाहिल्यास मी ओळखु शकतो, आरोपींनी ज्या काठयांनी मारहाण केली, त्या मुद्देमाल अनुक्रमांक १ ते ३ दाखविल्या, त्या आर्टिकल अ ते क आहेत हे मी खोटे सांगतो.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

माझे समक्ष नोंदविले.
श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–
(**एस. एस. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, महाड

महाड
दिनांक – ०४/०८/२०२२